**नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५**
**सरकार-वि- पंढरी व इतर**
**निशाणी क्र. ६७**



**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ सतीश देविदास गडलिंगे यांचा उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २४ वरील मेमोरेंडम पंचनाम्यामध्ये पंढरी कुंभरे याने वाघाबद्दल काही सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ५३ वरील पंचनाम्यामध्ये नंदू भलावी, किशोर भलावी व छेदीलाल ठाकूर यांनी वाघाबद्दल काही सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरील आरोपींकडून वाघाच्या मिशा, दात व पंजे जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुरी, घमेले व तार हे आरोपींच्या घरून जप्त केले व आरोपींना रानडुक्कर शिकारीच्या खोटया केसमध्ये अडकवले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सुरी ही आरोपीच्या घरातून घेतली व बाकीचे साहित्य घटनास्थळावरून जप्त केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ख-या आरोपींना अटक केली नाही व चुकीच्या आरोपींना पकडून त्यांच्याविरुध्द खोटी चार्जशिट तयार केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ते ६ यांचा वाघ मारल्याबाबत कबूली जबाब या केसमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कागदपत्र तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.04 15:35:22 +0530

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सावनेर,
दिनांक ०४.०४.२०२६

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ६७

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe